पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

पुणे महानगरपालिका
सभेचा वृत्तांत (सभा क्रमांक ६६)
गुरुवार, दिनांक ७/०३/२०२४, दुपारी ३.०० वाजता

पुणे महानगरपालिकेची विशेष (खास) सभा (माहे मार्च २०२४ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक ७/३/२०२४ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयात भरली होती.

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१)	मा.विक्रम कुमार, भा.प्र.से.	–	प्रशासक तथा महापालिका आयुक्त,पुणे
२)	मा.रविंद्र बिनवडे	–	अति.महा.आयुक्त (ज)
३)	मा.डॉ.कुणाल खेमनार	–	अति.महा.आयुक्त (इ)
४)	मा.विकास ढाकणे	–	अति.महा.आयुक्त (वि)
५)	मा.डॉ.भगवान पवार	–	आरोग्य प्रमुख
६)	मा.प्रशांत वाघमारे	–	शहर अभियंता
७)	मा.सौ.उल्का कळसकर	–	मुख्य लेखा व वित्त अधिकारी
८)	मा.माधव जगताप	–	कर आकारणी व कर संकलन प्रमुख
९)	श्रीमती योगिता भोसले	–	प्रभारी नगरसचिव

तसेच सर्व खाते प्रमुख व विभाग प्रमुख

मा.विक्रम कुमार, भा.प्र.से., प्रशासक तथा महापालिका आयुक्त हे सभापती म्हणून अध्यक्षस्थानी होते.

मा.प्रशासक : सभा सुरु करावी.

नगरसचिव : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील नियम क्र. १(एच) अन्वये आजची विशेष (खास) सभा बोलविण्यात आली आहे.

विषय क्र. ४२०

सन २०२४-२०२५ साठी स्थायी समितीने तयार केलेला जमा खर्चाचा अर्थसंकल्प ''अ'' व ''क'' विचारासाठी.

नगरसचिव :पुणे महानगरपालिकेचे सन २०२४-२०२५ साठी स्थायी समितीने (प्रशासक) तयार केलेला जमा खर्चाचा अर्थसंकल्प ''अ'' व ''क'' सभेपुढे सादर करण्यात येत आहे. मा.आयुक्त तथा प्रशासक यांना विनंती आहे की त्यांनी तो सर्वांपुढे सादर करावा.

(मा.प्रशासक तथा महापालिका आयुक्त यांनी सन २०२४-२०२५ चा जमा-खर्चाचा अर्थसंकल्प अ व क सभागृहात सादर केला.)

ठराव क्र. :- ४२१

संदर्भ : १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ३४९, दि. ४/१०/१९८३
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२५३, दि. १९/१/२०२४
३) मा.महापालिका सभा ठराव क्र. ३३७, दि. १९/१/२०२४
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१६६८, दि. २७/२/२०२४ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र. १८१९, दि. ७/३/२०२४

सन २०२४–२०२५ साठी मा.महापालिका आयुक्त यांनी सादर केलेला पुणे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प ''अ'' व ''क'' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०० अन्वये मान्य करण्यात येत आहे.

निर्णय : सदर विषय संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपल्याचे मा.प्रशासक यांनी जाहीर केले.

सही/–XXX
योगिता भोसले,
प्र. नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

****

दिनांक १५–०३–२०२४ च्या सभेत वृत्तांत कायम केला.

सही/–XXX

प्रशासक, पुणे म.न.पा.

****